MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १२ अंक : ३ पाने : १२ एप्रिल-मे २०१८
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

वीजनिर्मितीत झालेली वाढ, वितरण जाळ्यातील सुधारणा आणि ऊर्जा बचत आणि संवर्धनाच्या विविध उपायांमुळे महापारेषण आणि महावितरण कंपनीला यावर्षी मोठेच यश मिळाले आहे. यावर्षी देशभर उष्म्याने नागरिकांची आणि देशाची जणू परीक्षाच पाहिली. देशभरात उष्मा वाढतच गेल्याने मे महिन्यात विजेच्या मागणीने उच्चांक गाठला होता. २६ मे २०१८ रोजी तर देशभरात एकूण १७०,१२१ मेगावॅट वीजमागणीची नोंद झाली. गतवर्षीच्या याच दिवसाच्या तुलनेत ती ८ टक्क्यांनी अधिक होती. त्यात महाराष्ट्राचा विक्रमी २३,७४६ मेगावॅट इतका वाटा होता. ही मागणी महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक होती. दोन्ही कंपन्यांनी उत्तम समन्वय ठेवून आणि नियोजन करून ती पूर्ण करण्यात यश मिळविले आहे, ही सार्थ अभिमान

> *“ महापारेषण व महावितरण कंपनीने महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्व विक्रम मोडित काढत २३,९५० मेगावॅट वीज कोणत्याही अडथळ्यांविना पारेषित केली.*

बाळगावा अशी आनंदाची गोष्ट आहे. विशेषत: सर्व छोट्या गावांना वीजपुरवठा करण्याचे स्वप्न देशाने साकार केले असतानाच विजेच्या विक्रमी मागणीला महाराष्ट्र अतिशय उत्तम तयारीने आणि समर्थपणे सामोरा गेला आहे.

यावर्षी तापलेल्या उन्हाळ्यात उत्तर प्रदेशमध्ये १९,०२९ मेगावॅट, दिल्लीत ६,०९९ मेगावॅट, राजस्थानमध्ये १०,३९५ मेगावॅट, गुजरातमध्ये १६,८२५ मेगावॅट, तर महाराष्ट्रात २३,७४६ मेगावॅट विजेची मागणी नोंदविली गेली. विजेला मोठ्या प्रमाणावर मागणी असतानाही जम्मू आणि काश्मीर, आसाम आणि उत्तराखंड वगळता इतर कोणत्याही राज्यात वीजतुटवडा जाणवलेला नाही. दिल्लीतील वीज वितरण कंपनी रिलायन्स इन्फ्राच्या बीएसईएसने हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, सिक्कीम आणि भूतानसोबत हायड्रो पॉवर बँकिंग दीर्घकालीन करारांमुळे वीजपुरवठा सुरळीत होऊ शकला. अलीकडे सरकारने विजेसंदर्भाने जे करार केले आहेत, त्याचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत.

यंदाच्या उन्हाळ्यात २३,९५० मेगावॅट विजेची मागणी नोंदविण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे ४०० मेगावॅटने विजेची मागणी वाढली तरी महावितरणकडून विजेची उपलब्धता व तांत्रिक व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करून ही यंदाची विक्रमी मागणी यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. महावितरणकडून विजेची उपलब्धता व तेवढाच पुरवठा याचा हा यावर्षीचा विक्रम आहे. सर्व जिल्ह्यात महावितरण व महापारेषण यंत्रणेचे सातत्याने सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येत आहे. तसेच या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे तसेच नवे तंत्रज्ञान वापरून करण्यात येत आहेत. त्यामुळे विजेची मागणी वाढत असतानाही यंदाच्या उन्हाळ्यात आतापर्यंत जिल्ह्याच्या कोणत्याही भागात वीजटंचाईमुळे भारनियमन करण्याची गरज पडली नाही. तसेच सर्वाधिक विजेच्या मागणीएवढाच पुरवठा करणे महावितरणला शक्य झाले आहे. सध्या महावितरणला महानिर्मिती कंपनीकडून सुमारे ६,७०० मेगावॅट केंद्रीय प्रकल्प तसेच दीर्घ व लघु मुदतीच्या कराराव्दारे सुमारे १०,२०० मेगावॅट आणि इतर विविध स्त्रोतांकडून सुमारे ३,९०० मेगावॅट वीज उपलब्ध झाली आहे.

सद्यस्थितीतील पारेषण प्रणालीमध्ये ३१ मार्च २०१८ पर्यंत महापारेषण कंपनीमध्ये एकूण ६६० अति उच्च दाब उपकेंद्रे (+/-५०० के.व्ही. च्या २ एच.व्ही.डी.सी. उपकेंद्रासह) कार्यान्वित आहेत. या सर्व उपकेंद्रात मिळून एकूण १२३८४६.५ एम.व्ही.ए.स्थापित क्षमता आहे. महापारेषण कंपनीमध्ये एकूण ४६,२१८ सर्किट किलोमीटर (१५०४ कि.मी. च्या एच.व्ही.डी.सी. विद्दुधारा वाहिन्यांसह) अति उच्च दाब वाहिन्या कार्यान्वित आहेत.

चालू वर्षात एकूण १० नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे उभारणे प्रस्तावित आहेत. या उपकेंद्रात व अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रात क्षमतावाढीव्दारे मिळून एकूण ३७७५ एम.व्ही.ए.ची भर स्थापित क्षमतेत करणे व एकूण १५५८ सर्किट किलोमीटर



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अति उच्च दाब वाहिन्या उभारणे प्रस्तावित आहे. या सर्व कामांवर मिळून एकूण बाराशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यापैकी मार्च २०१८ अखेरपर्यंत १२ नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे, ५३६० एम.व्ही.ए. स्थापित क्षमतेत वाढ व १६०० सर्किट किलोमीटर अति उच्च दाब वाहिन्या उभारणे ही उद्दिष्टे साध्य करण्यात आली आहेत. तसेच या सर्व कामांवर मिळून फेब्रुवारी २०१८ अखेरपर्यंत एकूण ७१३ कोटी रुपये भांडवली खर्च झाला आहे.

महाराष्ट्रात होत असलेले औद्योगिकीकरण, देशातील सर्वाधिक शहरीकरण, आणि शेतीच्या सिंचनासाठी विजेचा होत असलेला वापर यामुळे राज्य विजेच्या वापरात आघाडीवर आहे. पण, त्याचबरोबर भविष्यात ते एक आव्हानही आहे.

सर्वाधिक वीजमागणीला यावर्षी आपण यशस्वीपणे सामोरे गेल्यामुळे आपल्या क्षमतेची एक कसोटीच आपण पार केली आहे. याकाळात महाराष्ट्राला अखंडित वीजपुरवठा करण्याची पराकाष्ठा करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन! भविष्यातही अशीच कामगिरी कराल, अशी आशा बाळगतो.

**शुभेच्छांसह..!**

**– पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**नवी दिल्ली :** नॉर्थ ब्लॉक येथे केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांच्या कक्षात चंद्रपूर जिल्ह्यातील ऊर्जा विभागाशी निगडीत विविध समस्यांवर बैठक घेण्यात आली. याप्रसंगी राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महाजनकोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, संचालक (खाण) श्याम वर्धने.

## ■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती ■

# ऊर्जानिर्मितीसाठी इरई धरणाचे संवर्धन करणार

■ *टीम महापारेषण, मुंबई*

चंद्रपूर जिल्ह्यातील महाजनकोअंतर्गत येणा-या वीजनिर्मिती प्रकल्पास इरई धरणाचे पाणी वापरले जाते. या धरणात पाणी मुबलक असावे, यासाठी या धरणाचे संवर्धन केले जाईल, अशी माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.


नॉर्थ ब्लॉक येथे केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांच्या कक्षात चंद्रपूर जिल्ह्यातील ऊर्जा विभागाशी निगडीत विविध समस्यांवर बैठकीचे आयोजित करण्यात आली. या बैठकीस महाजनकोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, संचालक (खाण) श्री. श्याम वर्धने उपस्थित होते.

यावेळी चंद्रपूर जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी (महाजनको) चा वीजनिर्मिती प्रकल्प आहे. या प्रकल्पाला लागणारे पाणी हे इरई धरणातून आणले जाते. सध्या धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे वीजनिर्मिती करण्यास पुढील काळात समस्या निर्माण होऊ शकते. ही समस्या निर्माण होऊ नये, यासाठी चारगाव धरणाचे पाणी इरई धरणात सोडले जाईल असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. याशिवाय पाण्याची पातळी वाढविण्यासंदर्भातील इतर उपाययोजनाही आखण्यात येतील, असे श्री. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले. इरई धरणाचे संवर्धन करण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिका आणि महाजनकोमध्ये करार करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

चंद्रपूर जिल्ह्यात असणा-या वीज़निर्मिती प्रकल्पाला रेल्वे मार्गाने कोळसा पुरविण्याकरिता अधिक खर्च येतो. हा खर्च कमी करण्यासाठी जवळच असलेल्या बरांज कोळसा खाणीतून कोळसा मिळाल्यास सुविधा होऊ शकते. यासाठी बरांज कोळसा खाणीशी पुढील काळात करार करण्यात येईल, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.


### सौरऊर्जा महामंडळाच्या मदतीने ऊर्जा प्रकल्प उभारणार

**महाजनकोचा चंद्रपूर जिल्ह्यातील खुल्या जागेचा अभ्यास करून या ठिकाणी भारत सरकारच्या सौरऊर्जा महामंडळ आणि महाजनकोमध्ये करार करून सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबतचे बैठकीत निश्चित करण्यात आले.**



## *महापारेषणची सद्यस्थिती*

३१ मार्च २०१८ पर्यंत एकूण ६६० अति उच्च दाब उपकेंद्रे.





**मंत्रालय :** पत्रकार परिषदेत प्रसारमाध्यमांना माहिती देताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे (मध्यभागी), डावीकडून ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावार, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक.

## दोन लाख शेतकऱ्यांना एचव्हीडीएस योजनेतून कनेक्शन देणार : ऊर्जामंत्री

# राज्यात २३ हजार मेगावॅटएवढे उच्चांकी वीज पारेषण व वितरण

*टीम महापारेषण, मुंबई*

राज्यात विजेची मागणी पूर्ण होत असून राज्यात २३ हजार १०० मेगावॅट एवढ्या विजेचे पारेषण व वितरण ऊर्जा विभागामार्फत करण्यात येत असल्याची माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पैसे भरुन प्रलंबित असलेल्या सुमारे २ लाख २४ हजार कृषी पंप ग्राहकांना आता उच्चदाब वितरण प्रणालीतून वीज कनेक्शन देण्यात येणार आहे. यामुळे २ शेतकऱ्यांना एक रोहित्र या एचव्हीडीएस प्रणालीला मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांना दिली.

विजेच्या दृष्टीने राज्य स्वयंपूर्ण होत असल्याचे सांगून ऊर्जामंत्री म्हणाले, २००० मेगावॅटचे सौरऊर्जेवर आधारित प्रकल्प डिसेंबर २०१९ पर्यत पूर्ण करण्यात येतील. राज्यात सध्या कोणत्याही पद्धतीचे भारनियमन सुरू नाही. कृषी संजीवनी योजनेला अल्प प्रतिसाद मिळाला त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी थकित वीजबिलाचे किमान पाच हजार रुपये भरुन ऊर्जा विभागाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी पंपधारक ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) मार्फत वीज कनेक्शन देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पैसे भरले पण वीज कनेक्शन मिळाले नाही अशा शेतकऱ्यांना आता या योजनेतून वीज कनेक्शन देण्यात येणार आहेत.


सध्याच्या पद्धतीनुसार शेतकऱ्यांना ६५ व १०० केव्हीए क्षमतेच्या रोहित्रातून १५ ते २० कृषी ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्यात येतो. यामुळे लघुदाब वाहिनीची लांबी वाढते व वीजहानी मोठ्या प्रमाणात होते. शिवाय शेतकऱ्यांना कमी दाबाने वीजपुरवठा होतो. वीजपुरवठ्यात वारंवार बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होणे, तांत्रिक वीजहानी, रोहित्र बिघाड, विद्युत अपघात आदींना महावितरणला सामोरे जावे लागते. या सर्व अडचणींवर एचव्हीडीएस योजनेद्वारे मात करता येणे शक्य होणार आहे.

उच्चदाब प्रणालीत उच्चदाब वाहिन्यांवरील विद्युत प्रवाह मोठ्या प्रमाणात कमी होईल. या प्रणालीमुळे वाहिन्यांवर आकडे टाकून वीज चोरी करता येणार नाही. या योजनेवर ४४९६.६९ कोटी व नवीन उपकेंद्रासाठी लागणारा अंदाजे खर्च ५५१.४४ कोटी अशा एकूण ५०४८.१३ कोटी रुपये इतक्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच विदर्भ व मराठवाडा विभागातील कृषिपंपांना वीज जोडणी देणे या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ व २०१९-२० साठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल.

हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण होण्यासाठी महावितरणच्या मुख्यालयात एक स्वतंत्र कक्ष स्थापण्यात येणार आहे. एचव्हीडीएस योजना लागू झाल्यांनतर लघुदाब व उच्चदाब वितरण प्रणाली या दोन्ही प्रणाली कार्यरत राहतील, असेही ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

### विक्रमी २३ हजार ७०० मेगावॅट विजेचा पुरवठा

महावितरणने दि. २३ एप्रिल २०१८ रोजी राज्यात २३ हजार ७०० मेगावॅट विजेचा यशस्वीपणे पुरवठा केला. मागील काही वर्षात वीज यंत्रणेचे मोठ्या प्रमाणात सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात आल्यामुळे विजेच्या एवढ्या विक्रमी मागणीचा पुरवठा करणे महावितरणला शक्य झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा करताना वीज वितरण यंत्रणेत कोणताही बिघाड न होता वीजपुरवठा झाला.



### महापारेषणची सद्यस्थिती

४६२१८ सर्किट कि.मी.अति उच्च दाब वाहिन्या कार्यान्वित



नियुक्ती

# महापारेषणच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी पराग जैन नानोटिया

## ■ वित्त विभागाच्या (व्यव) सचिवपदी श्री. राजीव कुमार मित्तल ■

■ टीम महापारेषण, मुंबई

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्री. पराग जैन नानोटिया (आय.ए.एस.) हे दि. ०३.०५. २०१८ रोजी रुजू झाले आहेत. ते १९९६ च्या तुकडीतील वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्यांनी श्री. राजीव कुमार मित्तल (आय.ए.एस) यांच्याकडून नुकताच पदभार घेतला आहे. श्री. राजीव कुमार मित्तल यांची सचिव, वित्त विभाग (व्यव), महाराष्ट्र शासन येथे बदली झाली आहे.

महापारेषणमध्ये रुजू होण्यापूर्वी श्री. जैन हे विशेष विक्रीकर आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांना व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील २० वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते आय.आय.टी. दिल्लीचे बी.टेक (इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स) इंजिनिअर आहेत. त्यांना संघबांधणी, प्रकल्प नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन यांचा मोठा अनुभव आहे.

### रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लिमिटेडच्या संचालकपदी पराग जैन नानोटिया

**रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लिमिटेडचे महाराष्ट्र शासनाच्या नामनिर्देशित संचालक म्हणून श्री. पराग जैन नानोटिया (आय.ए.एस.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**राजीव कुमार मित्तल** (भा.प्र.से.)
सचिव,वित्त विभाग (व्यव)

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी केली कामांची पाहणी

थेट-भेट



**नाशिक :** अउदा प्रकल्प मंडळ, नाशिक महापारेषण अंतर्गत १३२ के.व्ही.घारगाव उपकेंद्र व १३२ के.व्ही.वडजिरे उपकेंद्र प्रकल्पाला अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी भेट दिली. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, जयंत वीके व अन्य अधिकारी वर्ग.

■ टीम महापारेषण, नाशिक

अउदा प्रकल्प मंडळ, नाशिक महापारेषण अंतर्गत १३२ के.व्ही. घारगाव उपकेंद्र ता. संगमनेर व १३२ के.व्ही.वडजिरे उपकेंद्र ता.पारनेर जि.अहमदनगर येथील प्रकल्पांचे रखडलेली अपूर्ण कामे पूर्ण होण्यासाठी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी भेट देऊन कामांची पाहणी केली. संबंधित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित एजन्सी व अधिकारी यांना सूचना देऊन योग्य ते मार्गदर्शन केले. तसेच ही कामे जून २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

दौऱ्यासाठी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता जयंत वीके, अधीक्षक अभियंता पी.पी.भालेराव, प्रभारी अधीक्षक अभियंता व्ही. एम.ढोरे, अधीक्षक अभियंता के.एम.जाधव, नासिर काद्री, कार्यकारी अभियंता एस.आर. तिरमारे यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) ५८ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकाशगंगा येथील मुख्यालयात 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी ध्वजारोहण केले.

यावेळी 'महापारेषण'चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, एस.पी. सावळे, महेंद्र वाकळे, दक्षता अधिकारी बी.एम.पाटील, शिष्टाचार अधिकारी अनिल कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## *महापारेषणची सद्यस्थिती*

१० नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे उभारणे प्रस्तावित





# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, कार्यकारी अभियंता मोहन ननवरे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) महेंद्र वाकळे, एस.पी.सावळे, श्यामसुंदर महिंद्रकर यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती कराड परिमंडळात उत्साहात

■ *टीम महापारेषण, कराड*

अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, कराड येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य अभियंता श्री. सुरेशकुमार पाटील यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी सह्याद्री हॉस्पिटल यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी माजी प्राचार्य श्री. कालेकर, श्री. खोब्रागडे, श्री. श्रीरंग गाढवे, श्री. मिराशी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. व्ही.सी.तोरणे व श्री. अशोक पारधी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुनील इंगवले यांनी केले.

# महामानवाच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताह साजरा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त नाशिक परिमंडळात विविध कार्यक्रम घेण्यात आले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये रक्तदान शिबिर, निबंध स्पर्धा, वृक्षारोपण आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

सुरवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी घेतलेल्या रक्तदान शिबिरात ३६ जणांनी रक्तदान केले तर निबंध स्पर्धेत १८ जणांनी सहभाग नोंदविला. याप्रसंगी कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमासाठी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, अधीक्षक अभियंता किशोर जाधव, प्रवीण भालेराव, शरद लोखंडे, नासिर काद्री, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) प्रमोद गोडसे यांनी पुढाकार घेतला. श्री. गंगाधर अहिरे यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार या विषयावर तर श्री. किरण मोहिते यांचे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार या विषयावर व्याख्यान झाले.



**नाशिक :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त नाशिक परिमंडळात सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी वृक्षारोपण करताना अधिकारी व कर्मचारी वर्ग.

■ कायकवे कैलास ■

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

जय बसव



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सुरवातीला महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.,मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.,आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाकळे यांनी मानले.

■ विविध विषयांवर चर्चा ■

# खासदार श्री. हेमंत गोडसे यांची घेतली सदिच्छा भेट

■ *टीम महापारेषण, मुंबई*

थेट-भेट



**नाशिक :** नाशिक जिल्ह्याचे खासदार श्री. हेमंत गोडसे यांची नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके यांनी सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी श्री. प्रवीण भालेराव व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे.

नाशिक जिल्ह्याचे खासदार श्री. हेमंत गोडसे यांची नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके यांनी कंपनीचे स्मृतीचिन्ह व दैनंदिनी देऊन सदिच्छा भेट घेतली.

भेटीदरम्यान, नाशिक-आडगाव येथे होणारा केंद्र शासनाचा उपक्रम CPRI Testing Lab साठी EHV Connectivity संदर्भात चर्चा केली. Connectivity साठी येणाऱ्या ROW च्या अडचणी निर्माण होऊ नयेत, याकरिता सहकार्य करण्यास विनंती केली. या भेटीदरम्यान अउदा प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे उपस्थित होते.

## `महापारेषण`चे प्रेझेंटेशन



**नवी दिल्ली:** येथे आयोजिलेल्या इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या वार्षिक कार्यक्रमात `महापारेषण`च्या वतीने भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण करताना श्रीमती रिता आरस.



**नवी दिल्ली:** येथे आयोजिलेल्या इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या वार्षिक कार्यक्रमात सहभागी झालेली `महापारेषण`ची टीम.

# इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या कार्यक्रमात `महापारेषण`चे सादरीकरण

■ *टीम महापारेषण, मुंबई*

नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या वार्षिक कार्यक्रमात `महापारेषण`च्या वतीने भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले.

या फोरममध्ये सुमारे ३८ देशांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. या चर्चासत्रामध्ये `महापारेषण`तर्फे अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण ERP PM/Web GIS Core Team Lead श्री. विशाल वाघचौरे, सौ. रिता आरस, श्री. रितेश चौधरी व श्री. राहुल भट्ट यांनी केले. इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमचे अध्यक्ष श्री. रेजिकुमार पिल्लई यांनी वैयक्तिकरित्या या उपक्रमासाठी `महापारेषण`चे अभिनंदन केले आहे. ERP PM ने ``Implementation of MSETCL Web-GIS on BHUVAN platform`` या विषयावर शोधनिबंध सादर केला.

महापारेषणच्या टीमने ERP आणि GIS क्षेत्रामध्ये आत्मसात केलेला हा विशिष्ट प्रकारचा अनुभव आणि कौशल्यांचा उपयोग देशातील अन्य ऊर्जाक्षेत्रातील कंपन्यांनाही व्हावा, यासाठी महापारेषण तत्पर असल्याचे `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी सांगितले.

# चिपळूणमध्ये नवव्या व्दैवार्षिक अधिवेशनाचे उदघाटन




**चिपळूण जि. रत्नागिरी :** बॅकवर्ड क्लास सीनिअर इंजिनिअर्स ऍन्ड ऑफिसर्स असोसिएशनच्या ९ व्या व्दैवार्षिक अधिवेशनात बोलताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे. व्यासपीठावर जे.एस.पाटील, एस.टी.शिंदे, संजय घोडके, एन.बी. जारोंडे, राजू गायकवाड व अन्य.

■ *टीम महापारेषण, रत्नागिरी*

चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे आयोजिलेल्या बॅकवर्ड क्लास सीनिअर इंजिनिअर्स ऍन्ड ऑफिसर्स असोसिएशनच्या नवव्या व्दैवार्षिक अधिवेशनाचे उदघाटन महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांचे हस्ते झाले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष तथा महावितरणचे मुख्य अभियंता श्री. अनिल भोसले अध्यक्षस्थानी होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वतंत्र मजदूर युनियनचे अध्यक्ष श्री. जे.एस.पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य अभियंता (निवृत्त) सर्वश्री एस.टी.शिंदे, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संजय घोडके, सरचिटणीस एन.बी.जारोंडे, उपमुख्य अभियंता डी.एस.साळुंखे उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. राजू गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन श्री. संतोष सातपुते यांनी केले तर आभार श्री. प्रकाश जमदाडे यांनी मानले.

यावेळी पुढील दोन वर्षाकरिता नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये श्री. प्रकाश जमदाडे (अध्यक्ष), श्री. शांताराम पौनीकर (उपाध्यक्ष), श्री. मिलिंद बनसोडे (सरचिटणीस) श्री. ए.डी.सहारे (कोषाध्यक्ष)



## *महापारेषणची सद्यस्थिती*

फेब्रुवारी २०१८ अखेरपर्यंत एकूण ७१३ कोटी रुपये भांडवली खर्च



# महापारेषण अभियंत्यांसाठी दोन दिवसीय संवसु शिबिर

**■ टीम महापारेषण, प्रशिक्षण**

महापारेषण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता व अतिरिक्त अभियंता या पदावरील अभियंत्यांसाठी दोन दिवसीय संवसु शिबिर (O &M Summit) घेण्यात आले. त्यामध्ये सांघिक कार्यालय, वाशी व नाशिक परिमंडळामधून आलेल्या ९६ अभियंत्यांनी आपला सहभाग नोंदविला.

शिबिराच्या उदघाटनप्रसंगी संचालक (संचलन) सर्वश्री गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, मुख्य अभियंता (संवसु) श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे उपस्थित होते.



**भायंदर :** महापारेषणच्या अभियंत्यांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय संवसु शिबिराच्या समारोपप्रसंगी महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी व शिबिरार्थी.

शिबिरामध्ये नवीनतम संवयु पध्दती, समस्या व त्यावरील उपाय, उदाहरणे या बाबींवर उहापोह करण्यात आला. संचालक (संचलन) सर्वश्री गणपत मुंडे, मुख्य अभियंते श्रीकांत राजूरकर, श्रीराम भोपळे, शशांक जेवळीकर, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) अनिल कालेकर यांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या समारोपप्रसंगी संचालक (संचलन) सर्वश्री गणपत मुंडे, मुख्य महाव्यवस्थापक तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे उपस्थित होते. कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) श्री. विनायक बुरलीकर यांनी शिबिराचे समन्वयन केले. अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. शशिकांत बाकरे यांनी आभार मानले

■ महापारेषणचा पुढाकार ■

# कॅग अधिकाऱ्यांसाठी मुंबईत एक दिवसीय कार्यशाळा

**■ टीम महापारेषण, प्रशिक्षण**

महापारेषण कंपनीतर्फे कॅग या संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा सांघिक कार्यालयात घेण्यात आली. मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. अनिल कालेकर, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड, श्री. श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (विवले) श्री. सुनील दत्त शर्मा, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद मोहिरे, व्यवस्थापक (लेखा) सौ. मंजूषा चौधरी यांची या कार्यशाळेत व्याख्याने झाली.

या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी संचालक (वित्त) श्री. विनायक साठे उपस्थित होते. कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) श्री. विनायक बुरलीकर यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. अधीक्षक अभियंता श्री. शशिकांत बाकरे यांनी आभार मानले.



**मुंबई :** महापारेषण कंपनीतर्फे कॅग या संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी आयोजिलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता सर्वश्री श्रीकांत राजूरकर, डावीकडे संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) अनिल कालेकर.



## महापारेषणची सद्यस्थिती

उपकेंद्रात ३७७५ एम.व्ही.ए.ची भर स्थापित क्षमता होणार






**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे सदस्य म्हणून श्री. मुकेश खुल्लर आणि श्री. इक्बाल मजहर हुसैन बोहरी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी ऊर्जामंत्री सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डी.के.जैन, अरविंद सिंह, संजीव कुमार, बिपीन श्रीमाळी, पराग जैन नानोटिया.

# विद्युत नियामक आयोगाच्या सदस्यपदी श्री. खुल्लर, श्री. बोहरी

*टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे सदस्य म्हणून राज्याचे सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव श्री. मुकेश खुल्लर आणि नागपूरचे निवृत्त न्यायाधीश श्री. इक्बाल मजहर हुसैन बोहरी यांची नुकतीच निवड करण्यात आली. या दोन्ही सदस्यांना राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी गोपनीयतेची शपथ दिली.

मंत्रालयात पार पडलेल्या या शपथविधी कार्यक्रमाला मुख्य सचिव सर्वश्री दिनेश कुमार जैन, एमईआरसीचे अध्यक्ष आनंद कुलकर्णी, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यूपीएस मदान, सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव एस. एस. संधू, पाणीपुरवठा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव श्याम लाल गोयल, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव अरविंद सिंह,पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांच्यासह विविध विभागाचे सचिव, विद्युत नियामक आयोग आणि महावितरणचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे एप्रिल - मे २०१८

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | **अव्दैत व्यंकटेश देव** | मुख्य अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय | ०४.०४.२०१८ |
| २ | **अनिल विलास कोलप** | मुख्य अभियंता (पारेषण) | राज्य भार प्रेषण केंद्र | ०४.०४.२०१८ |
| ३ | **श्रीमती छाया प्रभाकर साळे** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अ.उ.दा.(संवसु) मंडळ, कराड | ०७.०४.२०१८ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | **अमृत हिरालाल बोरिचा** | मुख्य अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय | ३०.०४.२०१८ |
| २ | **मोरेश्वर सदाशिवजी जांगडे** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | चाचणी व दूरसंचार मंडळ, वाशी | ३१.०५.२०१८ |

# विद्युत सुरक्षितता सर्वोच्च प्राथमिकता

विद्युत संचमांडणी सुरक्षित ठेवण्यासाठी काय करावे, काय करू नये, विद्युत उपकरणे कशी हाताळावीत, उद्वाहनांचा सुरक्षित वापर करण्याबद्दलचे निकष, सुरक्षेच्या बाबी लक्षात घेऊन बनवले गेलेले नियम, गुणवत्ता, प्रशिक्षण, नियम न पाळल्यास होऊ शकणारी कारवाई अशा अनेक मुद्यांवर प्रकाशझोत टाकण्याचे महत्त्वाचे काम झाले.

विद्युत विभागात काम करणारे अधिकारी, कर्मचारी आदींच्या मदतीने जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचून जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी शहरातील प्राथमिक, माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतने, महाविद्यालये इ. ठिकाणी जाऊन प्रबोधन करणे, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करणे, पथनाट्य सादर करणे यासारखे कार्यक्रम घेण्यात आले.



**वीज वाहिनीखाली बांधकाम करु नका. ते धोकादायक व बेकायदेशीर आहे. असे करणे प्राणांतिक अपघातास निमंत्रण आहे.**

### घरगुती वीज ग्राहकांसाठी सुरक्षा सूचना

- विजेचे दिवे, ट्यूबलाईट, फ्यूजतार व इतर घरगुती उपकरणे बदलण्याच्या कामाखेरीज विद्युतसंच मांडणीची सर्व कामे महाराष्ट्र राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडूनच करुन घेणे बंधनकारक आहे. तात्पुरते वायरिंग करून विजेचे दिवे व उपकरणे वापरणे नेहमीच धोक्याचे असते.
- लोंबकळते व अयोग्य पद्धतीने जोड दिलेले वायरिंग धोकादायक असते.
- विद्युत प्लग, तारा व त्याला जोडलेली उपकरणे लहान मुलांपासून दूर राहतील याची काळजी घेणे गरजेचे आहे.

### शेतीपंपासाठी विद्युत सुरक्षा उपाय

- शेतीपंपासाठी विद्युतसंच मांडणी शासन मान्यताप्राप्त परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडूनच करून घ्यावी.
- शेतीपंपासाठी दोन स्वतंत्र अर्थिंग करून घेऊन ते कमीतकमी ८ गेजच्या भिन्न व अलग जी.आय. तारेने मोटार, मेनस्विच व त्याची लोखंडी पेटी व इतर उघडे धातूचे भाग यांच्याशी जोडावेत.
- कमी व्होल्टेजमुळे मोटार स्टार्टर ट्रीप होत असेल तेव्हा तो वायरिंग यंत्रणेतून अलग करून मोटार चालविण्याचा प्रयत्न केल्यास मोटार जळण्याचा धोका संभवतो.
- विद्युत वाहिन्यांच्या खाली कोणत्याही वस्तू अथवा शेतीमाल साठवू नये.
- विद्युत वाहिन्यांच्या जवळ अथवा सान्निध्यात खोदकाम करू नये व झाडे लावू नये.
- शेतीपंपासाठी वीज पुरवठादाराने अधिकृतरित्या दिलेली वीजजोडणीच वापरावी.
- शेतातील विद्युत वाहिनीच्या खांबाला अथवा ताणतारेला जनावरे बांधण्याचे टाळावे.

### बहुमजली इमारतीतील विद्युत संचमांडणी

- १५ मीटरपेक्षा उंच इमारतीतील (५ मजल्यापेक्षा उंच) विद्युत संचमांडणीस विद्युत पुरवठा करण्यापूर्वी ती विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून तपासून घेऊन त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
- केबल डक्टमधून इतर कोणतेही पाईप उदा. फायर फायटिंग, गॅस इ. नेऊ नये त्यामुळे आग, विद्युत धक्का इत्यादी धोके निर्माण होऊ शकतात.
- फ्लॅटमधील वायरिंग करताना कमीत कमी १ पॉवर सर्किट व फ्रीज, वॉशिंग मशीनसाठी वेगळे तसेच लाईट, पंखे यासाठी वेगवेगळे नियंत्रक स्विच वापरावेत.
- मीटर रूममध्ये कपडे, इतर वस्तू, ज्वालाग्राही पदार्थ ठेवू नये.

### उद्वाहन वापरकर्त्यांसाठी महत्त्वाचे

- जगात मोठ्या प्रमाणात उद्वाहनाचा वापर होतो.
- उद्वाहन येताना दिसणारे सिग्नल व आगमन घोषणांकडे लक्ष द्यावे.
- वारंवार कॉल बटन दाबल्याने उद्वाहन लवकर येणार नाही.
- उद्वाहन चालू झाल्यावर दाराला स्पर्श करू नये.
- आजकालची उद्वाहने ही मजल्याच्या योग्य पातळीवर येऊन थांबतील, अशा प्रकारे बनवलेली असतात. तरीदेखील उद्वाहन वर किंवा खाली थांबू शकते. अशा वेळी न बघता उद्वाहनाच्या आत किंवा बाहेर पडू नये.
- वय किंवा लिंगानुसार उद्वाहनात जाणे अथवा बाहेर येणे ठरवू नका.
- १२ वर्षाखालील मुलांना एकट्याने उद्वाहनात प्रवास करू देऊ नये.

### सर्वांसाठीच महत्त्वाच्या सुरक्षा सूचना


- विजेचे काम करीत असताना हातात रबरी मोजे घालावे.
- सेफ्टी शूज वापरावे. सर्वच ठिकाणची नादुरुस्त उपकरणे, जुने वायरिंग बदलून सर्व काही योग्य असल्याची खात्री करू या. संपूर्ण वर्षभर आपण सतर्क राहू व इतरांनाही सुरक्षित ठेवू.

**– स्मिता पाटील** (Source : www.mahanews.gov.in)



## महापारेषणची सद्यस्थिती

१५५८ सर्किट कि.मी.अति उच्च दाब वाहिन्या उभारणे प्रस्तावित



# स्वतंत्र विचार करणारे नेतृत्त्व हवे




विभागप्रमुखाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे, एवढेच त्या विभागातील अधिकारी-कर्मचारी काम आहे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. आजच्या आधुनिक जगात खरी गरज असते ती निर्णय क्षमता असलेल्या कर्मचाऱ्यांची. कंपनीच्या विकासाकरिता स्वतंत्रपणे विचार करणारे अधिकारी आणि कर्मचारी असतील तर ती कंपनी वेगाने पुढे जातेच, तिचा प्रत्येक दिवस नवीन प्रगतीचा टप्पा गाठणारा ठरतो. कोणत्याची आस्थापनात नेतृत्त्व हे महत्त्वाचे असतेच, यात काही शंका नाही. पण त्यासोबतच, त्या नेतृत्त्वाला जागरूकपणे साथ देणारे कर्मचारी–अधिकारी तेवढेच महत्त्वाचे असतात.

आपल्यासारख्या कंपनीचे काम फारच व्यापक, दूरदूरपर्यंत पोहोचणारे, ते काम त्याठिकाणी असणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या कौशल्याचे, तेवढेच जोखमीचे आणि तेवढेच महत्त्वाचे म्हणजे जनमाणसांवर परिणाम करणारे असते. ते काम कोणी एक दोन अधिकारी नियंत्रित करतील, असे कधीच होत नाही. त्यासाठी त्यांना अतिशय सशक्त, प्रामाणिक, विचारी आणि संवेदनशील सहकाऱ्यांची साथ लागते. या अर्थाने प्रत्येक सहकाऱ्याने प्रमुखासारखा विचार करणे आवश्यक असते. असे प्रमुख आपल्या कंपनीत जितके जास्त, तितके आपल्या कंपनीचे काम भविष्यातही चांगले होऊ शकते.

अशा या प्रमुख अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अंगी विशेष गुण असले पाहिजेत. फक्त आदेश ऐकण्यासाठी येथे आलो आहोत, या मानसिकतेतून त्याने बाहेर पडले पाहिजे. त्याने स्वतंत्र विचार करून आपल्या कामात सतत सुधारणा करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. आपल्या कामाशी निगडीत ध्येय त्याने सतत समोर ठेवून त्यासाठी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेऊन त्याने कर्तव्य बजाविले पाहिजे. बहुतेकवेळा नेहमीची कामे सुरळीत सुरु असतात, पण जेव्हा आणीबाणीची काही स्थिती निर्माण होते, तेव्हा धाडसाने काही वेगळा निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असली पाहिजे. स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता अशी अचानक येत नाही. त्यासाठी विविध कौशल्ये सतत आत्मसात करत राहावी लागतात. अवांतर वाचन करणे आवश्यक असते, तसेच नवीन आव्हानांना पेलायचे धाडस दाखवणे गरजेचे असते.

समूहात काम करताना टीमवर्क हे लागतेच. त्यामुळे आपल्या वरिष्ठ तसेच कनिष्ठ सहकाऱ्यांचा विश्वास आत्मसात करणे आणि त्यांच्या चांगल्या कामाची दखल घेण्याचे औदार्य त्याच्याकडे हवे आणि वेळप्रसंगी योग्य ती शिक्षा करण्याची कर्तव्यबुद्धीही हवी. काम जेव्हा वेळेत केले जात नाही, तेव्हा ते कधीतरी आणीबाणीची स्थिती निर्माण करते, हे त्याना माहित करून देणे. त्यामुळे आपण ज्या भूमिकेत काम करत असतो, त्या भूमिकेतील कामे आणीबाणीच्या स्थितीत जाणार नाहीत, याची तो सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

नेतृत्त्व करणे म्हणजे पद बजावणे नव्हे, तर आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता पुढच्या पायरीवर घेऊन जाण्याची जिद्द बाळगणे. त्याला स्वयंपूर्ण होण्यास मदत करणे. त्यांच्यामधील सुप्तगुणांना वाव देणे. त्यांचे मनोबल वाढविणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये भरीव वाढ होण्यास मदत करणे. किंबहुना, त्याला आपल्याही पुढे जाऊन कामगिरी करण्यास प्रवृत्त करणे. Leader तेव्हाच धन्यता मानतो, जेव्हा त्याचा Follower हा त्याहीपेक्षा मोठा होतो. खरं तर Leader व Follower या वायुमंडळाचे एक अविभाज्य अंग ठरतात. जसे सूर्य व सूर्यकिरणांना आपण वेगळे करू शकत नाही. नदीला समुद्रात सामावून जाण्यास आपण रोखू शकत नाही व बीजास, बिजांकुरण होण्यास आपण थांबवू शकत नाही, त्याप्रमाणे Leader व Follower चे संबंध ठरतात.

पदावर असताना मान मिळणे स्वाभाविक असते. कारण, पदावर बसलेल्या व्यक्तीकडे अधिकारशक्ती व पद असते. मात्र, पदावर नसूनसुद्धा ज्या व्यक्तींवर लोकांचा प्रभाव राहतो ते खरं नेतृत्त्व. जो आदर, प्रेमभाव, समर्पित होण्याची वृत्ती निर्माण करतो ते खरं नेतृत्त्व. निस्वार्थी, समभाव, सामाईक व निडर असणारा प्रत्येक व्यक्ती एक नेतृत्त्व ठरते. अशा अनेक नेतृत्त्वांना आपल्याला घडवायचे आहे. स्वतंत्र विचार करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण करावयाची आहे.

मला खात्री आहे, की आपण केवळ अनुकरणाला महत्त्व न देता या गुणांचा अभ्यास करून आपल्यातल्या नेतृत्त्वाला जागे ठेवाल.

**शुभेच्छांसह..!**

– सुगत गमरे
कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.